@sra.gov.in

D/Deputy Coll. 1/Admin Document 20..

# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

झोपुप्रा/प्रशासन/क्र.१६५/२०२६. दिनांक :- ०४/०५/२०२६.

## दरपत्रके मागविण्याबाबतची जाहिरात

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शासकीय कार्यालयांमधील १५० दिवसांच्या ई-प्रशासन सुधारणा कार्यक्रमांतर्गत कृती आराखडा निश्चित केला गेला आहे. त्याअंतर्गत **नाविन्यपूर्ण वेब अप्लिकेशन**मध्ये **"Service Delivery साठी WhatsApp चा वापर"** या मुद्द्याचा समावेश आहे.

उपरोक्त उल्लेखित विषयाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे करीता व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सॉफ्टवेअरची निर्मिती करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांना घरबसल्या विनामूल्य त्यांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील माहिती देण्यासाठी त्यांना हाताळण्यास सोप्या आणि अद्ययावत व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सॉफ्टवेअरची निर्मिती आणि विकास करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट २४ तास आणि सातही दिवस उपलब्ध असतो. यामुळे सामान्य नागरिक कोणत्याही वेळी आपली शंका विचारू शकतात किंवा माहिती मिळवू शकतात. रात्री-अपरात्री किंवा सुट्ट्यांच्या दिवशीही सामान्य नागरिकांना सेवा देणे व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉटमुळे शक्य होते. चॅटबॉट त्वरित प्रतिसाद देतो. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी किंवा त्यांना योग्य माहिती देण्यासाठी मानवी कर्मचाऱ्याची वाट पाहावी लागत नाही. यामुळे सामान्य नागरिकांचा वेळ वाचतो आणि त्यांना चांगली सेवा मिळाल्याचा अनुभव येतो. चॅटबॉट अनेक नागरिकांच्या प्रश्नांना एकाच वेळी हाताळू शकतो, त्यामुळे मानवी कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण कमी होतो व ते अधिक महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित करू शकतात. नागरिकांना सेवा देण्यासाठी मानवी कर्मचारी नियुक्त करण्यापेक्षा चॅटबॉट वापरणे अधिक किफायतशीर ठरते. कर्मचाऱ्यांच्या पगाराचा आणि प्रशिक्षणाचा खर्च वाचतो. नागरिकांना जलद आणि योग्य प्रतिसाद मिळाल्यामुळे त्यांचा अनुभव सुधारतो.

यास्तव, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयात सदर प्रणाली खरेदी करण्याच्या अनुषंगाने सोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर मोहोरबंद दरपत्रके मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे(प.)-४००६१० (ई-मेल :- adminoff@mmrsra.gov.in) या पत्त्यावर दि. ११.०५.२०२६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत सादर करावित.

सही /-

(संदीप माळवी)

मुख्य कार्यकारी अधिकारी

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे.

C:\SRA Thane\वॉट्स अ‍ॅप व चॅट बोट.docx

# व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणाली विकसित करण्यासंबंधी दस्तऐवज

**अ] कंपनी नोंदणी कागदपत्रे**

- कंपनी स्थापनेचे प्रमाणपत्र
- जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
- कंपनीचे पॅनकार्ड

**ब] आर्थिक कागदपत्रे**

- मागील 3 आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षित आर्थिक विवरणपत्रे (ताळेबंद आणि नफा-तोटा खाते)

**क] तांत्रिक क्षमता आणि अनुभव**

- मागील प्रकल्पांचा पोर्टफोलिओ
- माहिती सुरक्षेसाठी (Information Security) ISO २७००१ सारख्या संबंधित प्रमाणपत्रांच्या प्रती.
- मागील 3 वर्षांत शासकीय किंवा खाजगी क्षेत्रात प्रकल्प राबवल्याचे वर्क ऑर्डर्स.
- प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याची प्रमाणपत्रे.
- निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र.
- **काळ्या यादीत नसल्याचे प्रतिज्ञापत्र (Non-Blacklisting Declaration):** कंपनीला कोणत्याही शासकीय विभागाने बॅन केलेले नाही, तसेच कंपनीविरोधात कोणतीही कार्यवाही सुरु नाही असे प्रतिज्ञापत्र.

**1. प्रकल्प योजना (Project Plan)**

- सर्व टप्पे, कार्ये, महत्त्वाचे टप्पे दर्शविणारी सविस्तर प्रकल्प योजना.

**2. डिझाइन आणि आर्किटेक्चर कागदपत्रे**

- सॉफ्टवेअर आवश्यकता तपशील (Software Requirement Specification - SRS).
- सिस्टीम आर्किटेक्चर डायग्राम: सर्व घटक (डेटाबेस, सर्व्हर, APIs, व्हॉट्सअ‍ॅप गेटवे) आणि त्यांचा परस्पर संवाद दर्शविणारी उच्च-स्तरीय आकृती.

**3. डेटाबेस स्कीमा डिझाइन: डेटाबेस संरचनेची आकृती आणि वर्णन.**

- UI/UX वायरफ्रेम्स आणि मॉकअप्स: वापरकर्ता संभाषणाचा प्रवाह आणि वेब-आधारित अ‍ॅडमिन पॅनेलची दृश्य रचना.

**3. कामाची व्याप्ती (Scope of Work)**

- वापरकर्ता स्नेही (User-friendly) डॅशबोर्ड विकसित करणे.
- व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणाली मध्ये पुढील प्रश्नांची अचूक उत्तरे देणे आवश्यक आहे. (AI-based interactive)
  - झोपडपट्टी धारकांना त्यांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्रता, अपात्रतेसंबंधित माहिती

- पात्र झोपडपट्टीधारकांच्या वारसासंबंधी माहिती
- पात्र झोपडपट्टीधारकांच्या प्राधिकरणाच्या पुनर्वसन योजनेतील सदनिका व गाळा वाटपासंबंधी माहिती
- PAP अंतर्गत सदनिका वाटपासंबंधी माहिती.

- वरील बाबींशी संबंधित प्राधिकरणाच्या स्कॅन केलेल्या दस्तऐवजामधील उपयुक्त माहिती व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणालीमध्ये समाविष्ट करणे.
- व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणालीमध्ये मा. मुख्यमंत्री यांच्या 150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स संबंधी मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.
- भविष्यात शासनाकडून व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट प्रणाली संबंधी दिल्या जाणाऱ्या सूचना तसेच सुधारणांची सदर प्रणालीमध्ये अंमलबजावणी करणे बंधनकारक असेल.

**4. बौद्धिक संपदा अधिकार (Intellectual Property Rights - IPR)**

- विकसित केलेल्या सॉफ्टवेअरचा Source Code, डिझाईन आणि डेटावर पूर्ण मालकी हक्क मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचा राहील.
- विकासक कंपनीला हा डेटा किंवा कोड इतर कोणत्याही खाजगी कामासाठी वापरता येणार नाही.

**5. डॅशबोर्ड:**

- व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉटशी संबंधित महत्त्वाचे मेट्रिक्स (उदा. अपटाइम, संसाधनांचा वापर, ट्रॅफिक विश्लेषण, नागरिकांच्या प्रश्नांचे विश्लेषण) पाहण्यासाठी आणि चॅटबॉट सॉफ्टवेअरमधील माहितीची नोंद करणे, माहिती हटवणे, माहिती अद्ययावत (add-delete-update) करण्यासाठी भूमिका-आधारित (role-based) क्षमता असलेला सुरक्षित डॅशबोर्ड.

**6. सुरक्षा दस्तऐवजीकरण**

- सुरक्षा डिझाइन दस्तऐवज: ज्यामध्ये डेटा एन्क्रिप्शन पद्धती, ॲक्सेस कंट्रोल पॉलिसी आणि सामान्य वेब त्रुटी (web vulnerabilities) रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची रूपरेषा असेल.

**7. चाचणी योजना आणि अहवाल (Test Plans and Reports)**

- युनिट आणि इंटिग्रेशन चाचणी योजना व अहवाल.
- युजर एक्सेप्टन्स टेस्टिंग (UAT) योजना: विभागाला अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर चाचणी प्रकरणांसह (test cases).

**8. देखभाल आणि सहाय्य (AMC), सॉफ्टवेअर बिल ऑफ मटेरियल्स (BOM)**

- वापरलेल्या सर्व ओपन-सोर्स आणि त्रयस्थ (third-party) लायब्ररीजची त्यांच्या आवृत्ती क्रमांक (version numbers) आणि परवाना प्रकारांसह सर्वसमावेशक यादी.
- प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर किमान एका वर्षासाठी मोफत देखभाल आणि तांत्रिक सहाय्य द्यावे लागेल.